ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor: 6 . 91*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

***A Peer Reviewed Referred Journal***

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

**Vol. I Special ISSUE - XXXI Year – 7 15 August 2021**

# भारताच्या स्वातंत्र्याची अमृत वर्षाच्या दिशेने झालेली वाटचाल

Special Issue Editor by

**Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanathrao**

Dept. of Political Science

N. S. B. College, Nanded.

**Editor in Chief : Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded. (MH India) Email: Shrishprakashan2009@gmil.com

**Director : Mr. Tejas Rampurkar**

(For International contact only +91-8857894082)

**Address for Correspondence :** House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India -Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com umbarkar.rajesh@yahoo.com **Mob. No:** +91-9623979067 **Website:** www.wiidrj.com

| | | | |
|---|---|---|---|
| 16. | स्वातंत्र्य चळवळीत वृत्तपत्रांची भूमिका | प्रा. डॉ. एल. यु मेश्राम<br>प्रा. श्रीमती स्मिता भामरे | 69 |
| 17. | स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील लोकशाहीचे जनक – राजर्शी शाहू महाराज | प्रा.डॉ. कदम मोतीराम विठ्ठलराव | 73 |
| 18. | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत क्रांतीकारकांची भूमिका | प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने | 77 |
| 19. | थोर समाजसुधारक व स्वातंत्र्य सेनानी आत्मारामजी महाजन | डॉ. मोतीलाल रामचंद्र दर्वे | 82 |
| | भाग ३ | | |
| 20. | THE IMPACT OF ARTIFICIAL INTELLIGENCE (AI) ON SOCIETY IN THE LAST DECADE AND THE FUTURE | Assistant Prof. Dipali Shilvant | 89 |
| 21. | THE HISTORICAL CHANGES OF INCOME TAX IN INDIA | Dr. Kishor Lipare<br>Prof. Pooja R. Gaikwad | 94 |
| 22. | CLOUD COMPUTING ADOPTION AND IT'S IMPACT IN INDIA | Asst. Prof. Vaishali Mokashi | 99 |
| 23. | THE INDIAN ECONOMY BEFORE INDEPENDENCE AND THE ROLE OF THE PLANNING COMMISSION IN INDIA'S ECONOMIC DEVELOPMENT. | Ms. Swati Ramchandra Mithbavkar | 104 |
| 24. | उ. प्र. में भारतीय जनता पार्टी की दलीय व्यवस्था में मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ का योगदान | रविकरण<br>डॉ. राजीव रत्न द्विवेदी | 111 |
| 25. | भारताच्या स्वातंत्र्यानंतर कृषी क्षेत्रातील अन्नधान्ये उत्पादनातील प्रगती | प्रा. डॉ. शिवाजी पाते | 117 |
| 26. | भारत - पाकिस्तान संबंध | प्रा. निकम रमेश जगन्नाथ | 121 |
| 27. | पर्यटनाचा भारतातील विविध घटकांवर होणाऱ्या परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. सुहास बी. नांद्रे | 124 |
| 28. | स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेली भारतीय राष्ट्रीयतेसमोरील आव्हाने | श्री महाडिक डी. एन. | 127 |
| 29. | भारतातील स्वातंत्र्योत्तर दहशतवाद | महेंद्र पांडुरंग पवार | 131 |
| 30. | स्वातंत्र्योत्तर भारताच्या कृषीक्षेत्रात झालेला विकास व शेती तंत्रात झालेला बदल. | डॉ. ममता फुके | 134 |
| 31. | स्वातंत्र्योत्तर भारतातील दारिद्र्याची स्थिती | प्रा. मंजुषा एकनाथराव कोल्हे | 139 |
| 32. | भारतीय राष्ट्रीय एकात्मता व धर्म | प्रा. ए. बी. राऊत | 144 |
| 33. | भारत पाकिस्तान युद्ध : कारणे आणि परिणाम | सुभाष अढावतकर | 149 |
| 34. | आर्थिक सुधारणा कार्यक्रम | प्रा. डॉ. केशव दत्तराव तिडके | 157 |

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# भारतीय राष्ट्रीय एकात्मता व धर्म

प्रा. ए. बी. राऊत
कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे महाविद्यालय सटाणा

भारत स्वतंत्र झाल्यापासून धार्मिक विविधता ही राष्ट्रीय एकात्मते समोरील एक आव्हान म्हणून उभी राहिलेली आहे. स्वातंत्र्याबरोबरच हिंदुस्थानची धर्माच्या आधारावर फाळणी झालेली आपल्याला दिसून येते. स्वातंत्र्यानंतर काश्मिरमधील दहशतवाद, पंजाब मधील खलिस्तानवादी चळवळ ईशान्य भारतातील अनेक अलिप्ततावादी गट यांची समस्या भारतापुढे निर्माण झालेली आहे. पंजाब मधील व ईशान्य भारतातील समस्यांची तीव्रता कमी झाली असली तरी काश्मीरचा प्रश्न आजही मोठ्या प्रमाणात धगधगत आहे. भारतात आजही इस्लामिक दहशतवाद मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. यातूनच धार्मिक दंगलीचे प्रमाण वाढलेले दिसते. एका धर्माची संघटना निर्माण झाली की त्याला पर्यायी दुसऱ्या धर्माची संघटना भारतामध्ये निर्माण झालेली दिसून येते. यातूनच आर .एस. एस. व इतर संघटना निर्माण झालेल्या आहेत. यामुळे धार्मिक दंगली जातीय दंगे मोठ्या प्रमाणात होताना दिसून येतात. आणि धार्मिक व राजकीय नेते आपल्या स्वार्थासाठी खतपाणी घालतात. या समस्या हे प्रश्न जर संपवायचे असतील त्यासाठी आधुनिक दृष्टिकोनाचे आचरण करून राष्ट्रीयत्वा पुढे धर्म जात या गोष्टी गौण मानणे आवश्यक आहे. तरच भारतीय राष्ट्रवाद वाढीस लागण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवाद ही एक मानसिक भावना आहे ती प्रत्येक राष्ट्रातील व्यक्तीच्या मनामध्ये असते व या राष्ट्रवादतूनच राष्ट्रीय एकात्मता आकारास येत असते. राष्ट्रवादाच्या निर्मितीमध्ये प्रत्येक देशात वेगवेगळे घटक हे प्रभावी असलेले आपल्याला दिसून येतात. त्यामध्ये मुख्यतः समान भूप्रदेश, भाषिक एकता, संस्कृतिक एकता, इतिहास ,समान राजकीय महत्वकांक्षा इत्यादी घटक कारणीभूत ठरतात .भारतीय राष्ट्रवाद व राष्ट्रीय एकात्मता ही समान संस्कृती, समान राजकीय महत्वकांक्षा या घटकांवर आधारित असलेली आपणाला दिसून येते. भारतात अनेक धर्मांच्या चालीरिती रूढी प्रथा परंपरा यात भिन्नता आहे. त्यामुळे अनेक वेळा यातून वाद निर्माण होतात यातून राष्ट्रीय एकात्मतेला तडे जातअसलेलेदिसूनयेतात.

**संशोधनाचा उद्देश**

1.भारतीय राष्ट्रवादतील धर्माचा प्रभाव तपासणे

2.भारतातील वाढत्या धार्मिक फुटीरतावादी चळवळी मागील कारणांचा आढावा घेणे

3.राष्ट्रीय एकात्मतेच्या वाढीसाठी उपाययोजना सुचवणे.

भारतातील राष्ट्रवाद हा कोणत्याही एका घटकांमुळे निर्माण झालेला नाही. त्यासाठी अनेक घटक हे कारणीभूत असलेले दिसून येतात. आत्मीयता हा भारतीय राष्ट्रवादाचा गाभा आहे भारतामध्ये राष्ट्रवादाची निर्मिती ही अत्यंत संथपणे झालेली दिसून येते. आज भारतामध्ये जगातील सर्व धर्मांचे लोक दिसून येतात. भारतातील बहुसंख्य असणारा हिंदूधर्म हा विविध संप्रदाय जाती यामध्ये विभागलेला दिसून येतो. भारतामध्ये फार पूर्वीपासून सांस्कृतिक एकता अस्तित्वात होती. पण या एकतेचे राष्ट्रीय एकात्मतेत रूपांतर इंग्रज राजवट आल्यावर झाले. असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. ईस्ट इंडिया कंपनीने भारतात एकछत्री अंमल सुरु केला आणि त्यातूनच राष्ट्रीय एकात्मतेला सुरुवात झालेली दिसून येते. राष्ट्रीय एकात्मतेला खालील घटकांमुळे खतपाणी मिळत गेले.

- ब्रिटिशांनी राजवट करताना सर्व भारतीयांना सुरुवातीच्या काळामध्ये समान मानले. यातूनच भारतीय लोकांमध्ये आपण एक आहोत एकाच प्रकारे ब्रिटिशांकडून आपली फसवणूक होत आहे, आपले शोषण होत आहे अशी भावना निर्माण झाली
- ब्रिटिशांनी भारतीयांना राष्ट्रवाद उदारमतवाद जबाबदार शासन पद्धती यांचे ज्ञान झाले .
- दळणवळणाच्या सोयी मुळे देशांतर्गत मुक्तपणे लोकांचा संचार सुरू झाला यातूनच समाजसुधारक कवी विद्वान यांना आपले विचार समाजात पसरवण्यास मदत झाली.
- राष्ट्रीयत्वाचा विकासात इंग्रजी भाषेचाही मोठा वाटा आहे एक समान भाषा म्हणून तिने कार्य केले.
- त्याच बरोबर राजा राम मोहन राय दादाभाई नवरोजी महादेव गोविंद रानडे यांचे पुरोगामी विचार इंग्रजांनी आणलेला नवीन दृष्टीकोण यातून एक भारतीय ही भावना वाढीस लागली

**स्वातंत्र्य चळवळीत धर्माची भूमिका :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळी मध्ये लोकांच्या मध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी धर्माचा वापर केला गेला. टिळकांनी शिवजयंती व गणेशोत्सवाच्या माध्यमातून लोकांमध्ये एकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला खलिफा चळवळीला पाठिंबा देऊन महात्मा गांधींनी मुस्लिमांना राष्ट्रीय प्रवाहांत ओढण्याचा प्रयत्न केला. पण असे असले तरीही इंग्रजांनी बंगालची फाळणी करून फोडा आणि झोडा या नीतीचा वापर करून हिंदू आणि मुस्लिम यांच्यात दंगली लावण्याचा प्रयत्न केला. यातूनच भारताची विभागणी होऊन भारत आणि पाकिस्तान हे दोन देश निर्माण झाले व भारतीय उपखंडात कायमस्वरूपी अशांतता निर्माण झालेली दिसून येते.

**स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय एकात्मता व धर्म :**

**फाळणीतून स्वातंत्र्य :**

भारताला स्वातंत्र्य हे फाळणीतून मिळाले व त्यामुळे स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात हिंदू-मुस्लिम दंगे झाले आणि त्यातूनच हिंदूंचा भारत आणि मुस्लिमांचा पाकिस्तान ही संकल्पना अस्तित्वात आली व भारतीय एकात्मतेला तडे जाण्यास सुरुवात झाली

**काश्मीरचा प्रश्न :**

काश्मीरचा राजा हरिसिंग याला भारत किंवा पाकिस्तानमध्ये सामील न होता स्वतंत्र राहायचे होते. पण पाकिस्तानने मुजाहिद्दीन पाठवून काश्मीर गिळंकृत करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी राजा हरिसिंग याने भारताकडे मदतीची मागणी केली. भारताने पाकिस्तान मध्ये सैन्य पाठवले. पण सैन्य पोहचे पर्यंत अर्धा काश्मीर हा पाकिस्तानी काबीज केला होता. त्या काश्मीरला आता पाकव्याप्त काश्मीर असे म्हटले जाते. तर पाकिस्तान त्याला आझाद काश्मीर असे म्हणते. तेव्हापासून पाकिस्तान काश्मीर मध्ये दहशतवादी कारवाया करत आलेले दिसून येते. यासाठी धर्माच्या नावाखाली काश्मीरमधील तरुणांना भडकवण्याचे काम करते. आता काश्मीरला स्वतंत्र दर्जा देणारे 370 कलम रद्द केले. असले तरीही काश्मीरमध्ये शांतता निर्माण झालेली दिसून येत नाही. काश्मीरमधील पंडित आजही काश्मीर मध्ये जाण्यास तयार नाहीत. काश्मीरमधील तरुणांना सैन्यावरती दगडफेक करण्यासाठी पैसे दिले जातात. काश्मीरमधील अनेक राजकीय नेते हे फुटीरतावाद्यांना सहाय्य करताना दिसून येतात. त्यामुळे

धर्माच्या नावाखाली भारतीय एकात्मतेला धोका निर्माण झालेला आहे.

**पंजाबचा प्रश्न :**

देशाच्या फाळणीच्या काळापासून खलिस्तानचा प्रश्न निर्माण झालेला आहे. इंग्रजांनी भारताची फाळणी केली. त्यामुळे स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती झाली. त्याचवेळी काही शीख नेत्यांनी 'खलिस्तान' नावाने स्वतंत्र राज्याची निर्मिती करण्याची मागणी केली. स्वातंत्र्यानंतर पंजाबमध्ये पाकिस्तानच्या धर्तीवरच खलिस्तानची निर्मिती व्हावी अशी मागणी सुरू झाली. शिखांची स्वतःची मातृभूमी असावी या त्या मागचा हेतू होता. 'पंजाबी सूबा आंदोलन' म्हणूनही हे आंदोलन ओळखलं जातं. पाकिस्तानच्या निर्मितीनंतर स्वतंत्र राज्याची मागणी करण्यासाठी हीच योग्य वेळ आहे, असं पंजाबमधील नेत्यांना वाटलं. त्यामुळे स्वतंत्र राज्याची मागणी करण्यासाठी पंजाबमध्ये प्रचंड हिंसक आंदोलनेही झाली. त्यात अनेकांचा मृत्यूही झाला.

1971 मध्ये गजतीसिंग चौहान यांनी अमेरिकेत जाऊन तेथील वृत्तपत्रांमध्ये खलिस्तान राष्ट्राच्या नावाने जाहिरात दिली. तसेच या जाहिरातीतून या आंदोलनासाठी निधी देण्याचं आवाहनही केलं. त्यानेच 'खलिस्तान' शब्दाचा वापर केला. त्यानंतर मध्ये 1980 त्यांनी 'खलिस्तान राष्ट्रीय परिषदे'ची स्थापना केली आणि या संघटनेचा अध्यक्ष म्हणून स्वतःला घोषित केलं. लंडनमध्ये त्यानेच खलिस्तान देशाचं तिकीटही जारी केलं. 1978 मध्ये जगजीतसिंग चौहानने अकालींशी हातमिळवणी करून स्वतंत्र खलिस्तान देशाच्या निर्मितीसाठी आनंदपूर साहिबच्या नावाने 'संकल्प पत्र' जारी केलं होतं.

80 च्या दशकात खलिस्तान आंदोलन अधिक हिंसक आणि व्यापक होत होतं. दरम्यान पंजाबमध्ये दहशतवादी घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या. त्याचवेळी 'दमदमी टकसाल'चे जनरल सिंग भिंडरावाले हे खलिस्तानचे नेते म्हणून उदयास आले. त्यांच्या चिथावणीखोर भाषणांमुळे संपूर्ण पंजाब पेटून उठला होता. 1984मध्ये 'ऑपरेशन ब्लू स्टार'च्या माध्यमातून सैन्य कारवाई करण्याचा निर्णय घेतला. 1 जून 1984 केंद्र सरकारने 'ऑपरेशन ब्लू स्टार' सुरू करून सुवर्ण मंदिरात सैन्य घुसवले. बराच काळ हे ऑपरेशन सुरू होतं. त्यात भिंडरावाले मारले गेले. तसेच त्याचे शेकडो समर्थकही मारले गेले. खलिस्तान आंदोलन निष्क्रिय झालं आहे. पंजाबच्या शहरी आणि ग्रामीण भागात या आंदोलनाबाबत आजच्या पिढीत काहीच आकर्षण नाही. मात्र, भारताच्या बाहेर राहत असलेल्या शीख समुदायात या आंदोलनाचा प्रभाव दिसून येतो. अधूनमधून या चळवळीचे नारेही ऐकायला येतात. काही विदेशी शक्तींद्वारे या आंदोलनाला हवा देण्याचा प्रयत्नही केला जातो. भारतात असंतोष निर्माण करणे हा त्यामागचा हेतू असतो. सध्या भारतात ही चळवळ मृतावस्थेत असली तरी ती संपलेली नाही.

**अयोध्येचा प्रश्न :-**

अयोध्या मध्ये असलेली बाबरी मशीद ही बाबराने राम मंदिराच्या जागेवरती बांधली असे हिंदूंचे मत आहे, तर मुस्लिम ते मानावयास तयार नाहीत यातूनच भारतीय जनता पक्ष व बजरंगदल आरएसएस यांच्या पुढाकाराने सोरटी सोमनाथ ते आयोध्या अशी रथयात्रा लालकृष्ण अडवाणी यांच्या नियंत्रणाखाली आयोजित करण्यात आली. यातून हिंदूमध्ये राम मंदिरा बाबत जागृती निर्माण होऊन भारतीय जनता पक्षाची व्होटबँक

वाढलेली दिसून येते. पुढे कार सेवकांनी बाबरी मशीद उद्ध्वस्त केली व त्यातून मुंबईमध्ये व देशात इतरत्र मोठ्या प्रमाणात दंगे झाले' धार्मिक दंगली झाल्या मुंबईमध्ये बॉम्ब स्फोट झाले. यातून हिंदू-मुस्लीम वैर वाढीस लागले. मुस्लिमांना देशद्रोही ठरवण्यात आले पुढे न्यायालयाने या जागेबाबत निर्णय दिल्यामुळे हा वाद आता तरी मिटलेला दिसून येतो. पण यातूनच हिंदू-मुस्लीम मध्ये वैर निर्माण झालेले दिसून येते.

**वाढता धार्मिक प्रभाव**

**हिंदू धर्मवाद**

सध्याच्या आधुनिक वैज्ञानिक युगा मध्ये सुद्धा भारतीय जनतेवर धर्माचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढत असलेला दिसून येतो 60 ते 80 दशकात धर्माचा प्रभाव कमी होत असलेला दिसून येतो मात्र नंतर ऐंशीच्या दशकानंतर भारतामध्ये धार्मिक प्रभाव वाढत असलेला दिसून येतो राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बजरंग दल संभाजी ब्रिगेड या संस्थांनी व संघटनांनी हिंदू राष्ट्रवाद हा वाढीस लावलेला दिसून येतो . यातूनच एक प्रकारे समाजामध्ये विभागणी होत असलेली आपणास दिसून येते.

**मुस्लिम धर्मवाद**

भारतामधील मुस्लिमांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात धार्मिकता ही वाढीस लागलेली दिसून येते. आज जवळजवळ 90 टक्के पेक्षा जास्त मुस्लिम आपला पारंपरिक धार्मिक पेहरावा म्हणजेच हिजाब वापरत असलेली दिसून येतात. मुस्लिम महिला बुरखा वापरताना दिसून येतात तीन तलाक च्या विरुद्ध जेव्हा सरकारने कायदा करण्याचा सुरुवातीला प्रयत्न केला. तेव्हा कायदा रद्द करण्याचा निर्णय घेण्यासाठी अनेक कट्टर मुस्लिमांनी त्यांच्या महिलांना कायद्याविरोधात आझाद मैदानावर आंदोलन करण्यास प्रवृत्त केले हा कायदा कसा शरियतच्या विरुद्ध आहे. हे सांगण्याचा प्रयत्न केला आज मुल्ला मौलवी मुस्लिमांचे एक वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. अनेक मदरशांमध्ये कट्टर धार्मिक शिक्षण देऊन एक प्रकारे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ऑगस्ट मध्ये उज्जेन शहरात एका धार्मिक कार्यक्रमात तालिबान जिंदाबाद पाकिस्तान जिंदाबाद च्या घोषणा दिल्या जात आहेत .वाढत जाणारी धार्मिकता भारतीय एकात्मतेला किती हानिकारक आहे हे यावरून लक्षात येते.

**उपायोजना :**

- इतिहासातील मान-अपमान गोष्टी यांना महत्व न देता वर्तमान काळातील गरजा व व्यवस्था यांना महत्त्व देऊन धार्मिक प्रभाव कमी केला पाहिजे.
- धार्मिक शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्था वरती बंधने घालून त्यांना राष्ट्रीय एकात्मतेला पूरक शिक्षण देण्यास भाग पाडले पाहिजे.
- भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येक समुदायाला आपल्या शिक्षण संस्था काढण्याचा अधिकार आहे पण या अधिकाराचा गैरवापर होऊन का शिक्षण संस्थांमधून समाज विघातक शिक्षण दिले जाते. त्यामुळे अशा शिक्षणसंस्था वर बंधने घालून किंवा तो अधिकारच काढून घेऊन राष्ट्रीय एकात्मतेला पूरक असे शिक्षण दिले गेले पाहिजे

- मूलभूत हक्काबाबत पुन्हा एकदा विचार करून देश विघातक समाज विघातक हक्क नागरिकांना कितपत द्यावेत या दृष्टीने विचार केला पाहिजे
- कायद्याच्या आधारे जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन हा निर्माण केला पाहिजे
- विविध धार्मिक ग्रथांन पेक्षा राज्यघटनेला जास्त महत्त्व देण्याचा विचार जनतेमध्ये रुजवला पाहिजे
- धर्म ही वैयक्तिक पूजा करण्यापुरती बाब केंद्रीत ठेवली पाहिजे ,तरच भारताची राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागू शकते अन्यथा भारताचे विघटन होण्यास वेळ लागणार नाही

संदर्भ ग्रंथ :


1. http://khabar.ibnlive.in.com/news/13930/1
2. http://www.bbc.co.uk/hindi/news/cluster/2009/06/090605_bluestar25_sikhs_as.shtml http://www.bbc.co.uk/hindi/specials/920_bluestar1_rebels/
3. *"Kashmir: region, Indian subcontinent". Encyclopædia Britannica. Retrieved 16 July 2016.*
4. *"Jammu & Kashmir". European Foundation for South Asian Studies. Retrieved 4 May 2020.*
5. *Snow, Shawn (19 September 2016). "Analysis: Why Kashmir Matters". The Diplomat. Retrieved 4 May 2020.*
6. *Hobbs, Joseph J. (13 March 2008). World Regional Geography. CengageBrain. p. 314. ISBN 978-0495389507.*
7. *Margolis, Eric (2004). War at the Top of the World: The Struggle for Afghanistan, Kashmir and Tibet (paperback ed.). Routledge. p. 56. ISBN 9781135955595.*